③

शैक्षणिक वर्ष २००६-०७ करिता औषधनिर्माणशास्त्र या शाखेचे पदविका अभ्यासक्रम राबविण्यास नवीन संस्थांना मान्यता देण्याबाबत .....

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक :- मान्यता-२००६/(१५२/०६)/तांशि-६
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- 3 ऑगस्ट, २००६.

संदर्भ :- १. शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.३३८२/११८३६/(१९०)/तांशि - १अ, दिनांक २१ मे, १९८३.
२. शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र जीईसी २०९७/(१३८/९७)/तांशि-६, दि. १९ ऑगस्ट, १९९८.
३. शासन पत्र क्र. मान्यता २००५/(८८१/०५)/तांशि-६ दि.३ एप्रिल, २००६
४. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १०/एनजीपी/ पदविका प्रस्ताव/२००६/२०९ दि.३० जून,०६ अन्वये सादर झालेला राज्यस्तरीय समितीच्या दि.२७.६.२००६ रोजी झालेल्या बैठकीचा अहवाल
५.शासनाचे पत्र क्र. मान्यता-२००६/ (१२७/०६)/ तांशि-६, दि.१७ जुलै, २००६
६.अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र.एफ.२२- २५३४ /२००६, दि.२७.७.२००६.

शासन निर्णय :- सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र या शाखांचे पदवीका अभ्यासक्रम राबविण्यासाठी नवीन संस्थांना मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. उपरोक्त संदर्भ -३ मधील शासन मान्यतेस अनुसरुन तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत देण्यात आलेल्या जाहिरातीसंदर्भात ज्या विविध संस्थांनी सदरहू अभ्यासक्रमांसाठी नवीन संस्था सुरु करण्यासाठी अर्ज केले होते त्या अर्जांची छाननी करुन सदर छाननी अहवाल उपरोक्त संदर्भ - ४ मध्ये नमूद केलेल्या राज्यस्तरीय समितीसमोर सादर करण्यात आला होता. या प्रकरणी दि.२७.६.२००६ रोजी झालेल्या राज्यस्तरीय समितीच्या बैठकीत नवीन संस्थांबाबत समितीने केलेल्या शिफारशी संदर्भ -५ मधील पत्रानुसार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने राज्यस्तरीय समितीच्या शिफारसी विचारात घेऊन संदर्भ - ६ मधील पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार खाली नमूद केल्याप्रमाणे श्री संतकृपा शिक्षण संस्था, घोगांव, शिवाजीनगर, ता. कराड, जि. सातारा - ४१५ १११ व्दारा संचलित कॉलेज ऑफ फार्मसी (डी.फार्मसी) , व्दारा शिवाजीनगर, घोगांव, ता.कराड, जि.सातारा या संस्थेस आखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ. क्र. | पदविका अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता | अभ्यासक्रमाचा कालावधी | आवश्यक न्यूनतम शैक्षणिक अर्हता | मान्यतेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | औषधनिर्माणशास्त्र | ६० | २ वर्षे | १०+२ | सन २००६-०७ |

निम्न निर्देशित अटी व शर्ती मान्य असल्यासंबंधी तथा अन्य औपचारिक बाबीसंबंधात मान्यताप्राप्त संस्थांनी संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेशी करारनामा करणे बंधनकारक असून संचालक, तंत्रशिक्षण यांनी संबंधित संस्थांत आवश्यक शिक्षक वर्ग नियुक्त केल्याची व या संस्थांत ग्रंथालय तथा प्रयोगशाळा पूर्णपणे कार्यान्वीत झाल्याची खात्री करावी व त्या नंतर सदर संस्थात प्रथम वर्षाची प्रवेश प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही करुन शासन मान्यताप्राप्त संस्थांची अद्ययावत यादी तयार करावी.

- उपरोक्त संदर्भ -१ मधील शासन निर्णयान्वये विना अनुदानित तंत्रशिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती संबंधित संस्थेस बंधनकारक असतील.
- उपरोक्त संदर्भ -२ मधील शासन निर्णयातील तरतूदीनुसार किमान ५ वर्षे कालावधीसाठी आवश्यक मुदतठेवीची रक्कम संस्थाचालक व संचालक, तंत्रशिक्षण यांच्या संयुक्त खात्यात जमा करावी लागेल.
- शासनाने विहीत केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून यापुढे विहीत करण्यात येणाऱ्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भाधिन पत्रात व त्या पत्रासोबतच्या प्रपत्रामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.
- सदर पदविका अभ्यासक्रमासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाची संलग्नता आवश्यक राहील.
- सदर संस्थांनी पुढील शैक्षणिक वर्षात फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम-१२ मधिल तरतूदीनुसार फार्मसी कौन्सील ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेणे बंधन कारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.गो.खडपकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये
३. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई.
४. संबंधीत संस्था

**प्रत माहितीसाठी**

१. अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्पोर्टस कॉम्प्लेक्स, आय.पी. इस्टेट, नवी दिल्ली - ११० ००२.
२. सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल ॲश्युरन्स बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई -२०.
३. निवड नस्ती / तांशि -६